Historicity Research Journal
Volume 1 | Issue 9 | May 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

सुलतान काळातील प्रशासन व्यवस्था

राम फुन्ने

प्राचार्य स्व. नितीन कला व विज्ञान महाविद्यालय, पाथरी जि. परभणी.

सारांश :

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात अल्लाऊद्दीन खिलजी व शेरशहा सूर यांचे प्रशासन अत्यंत वैशिष्टयपूर्ण असल्याचा उल्लेख अनेक इतिहासकाराने केलेला आहे. सेनापती व प्रशासक या नात्याने अल्लाऊद्ददीन खिलजीची कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे. खिलजीने प्रशासनात सुधारणा करून शिस्त निर्माण केली. प्रशासनातील भ्रष्टाचार नष्ट करून प्रशासनात कार्यक्षमता निर्माण केले. त्यासाठी त्याने ह्या खात्याचा प्रभावी वापर केला. सरंजामदार व उमराव यांना नियंत्रणाखाली आणले. त्यातूनच त्याने जमीन सुधारणा, आर्थिक सुधारणा मोठया प्रमाणात केल्या.

प्रस्तावना :

भारताच्या इतिहासात उत्तम प्रशासक म्हणून शेरशहाचा उल्लेख केला जातो. शेरशहा एका नामांकित शासन प्रणालीचा शिल्पकार होता. त्याच्या युध्द कौशल्यापेक्षा त्याचे प्रशासन कौशल्य श्रेष्ठ प्रतीचे होते. सुयोग्य तत्वावर आधारित प्रशासनाची त्यांनी स्थापना केली. व तो स्वतः प्रशासनाचे केंद्रस्थान होता. शासनातील त्याचे स्वरूप सर्व सत्ताधाऱ्यांचे होते. तो अनियंत्रित व सार्वभौम राजा होता परंतु ही अनियंत्रित राजसत्ता त्यांने जनतेच्या हितासाठी राबविली.

शेरशहाने आपल्या राजकीय व्यवस्थेतील सर्व सूत्रे स्वतःच्या हाती केंद्रीत केली होती. त्याला मदत करण्यासाठी मंत्री परिषद होती. मंत्री परिषदेचे सभासद त्याचे सल्लागार होते. म्हणजेच शेरशहा हा त्याच्या प्रशासकीय व्यवस्थेतील एक खांबी तंबू होता.

सुलतान

दिल्ली सुलतानशाही साम्रज्यातील सर्वोच्च सुलतान होता. तो निरंकुश प्रशासक होता. मुस्लिम जगतातील एकमेव राजा व धर्मगुरू असलेले खलिफांची सत्ता मान्य करून दिल्लीचे सुलतान स्वतःला खलिफाचे प्रतिनिधी म्हणून घेत असले तरी तो एक परंपरेचा भाग होता. प्रत्यक्षात दिल्लीचा सुलतान हुकूमशहा असून मुल्ला मौलविंच्या धार्मिक आधाराने तो लष्करी व राजकीय सत्तांचे केंद्र असे. धार्मिक बाबतीत कट्टरवादी सुलतान हा मुस्लिम जनतेचा आदर्श सुलतान म्हणून त्यालाच मुस्लिम लोक श्रेष्ठ समजत असत. सुलतानाने कुराणातील कायद्याचे पालन सुलतानाने आपल्या वैयक्तिक जीवनात राज्यकारभारात व आपल्या धार्मिक धोरणात करावी अशी त्या काळातील मुस्लिम लोकांची अपेक्षा होती. बलबनने राजसत्तेच्या दैवी अधिकाराच्या सिध्दांताचा जोरदार पुरस्कार करून तो अत्यंत कठोरतेने अंमलात आणल्यामुळे तो जणू काही प्रती ईश्वरच बनला. बल्बननंतर अल्लाऊद्दीन खिलजी व महंमद तुघलकाने राज्यकारभारातील ऊलेमा वर्गाचा होणारा सततचा हस्तक्षेप मोडून काढला आणि राजकारण व धर्म यांची फारकत केली. सुलतान हा राज्याचा राज्यशासनप्रमुख होता. लष्कराचा सर्वोच्च सेनापती होता. व राज्यातील सर्वोच्च न्यायाधीश होता. सुलतानाची ईच्छा म्हणजेच कायदा असे. सुलतानाला सल्ला देण्यासाठी मंत्रिमंडळ असे. परंतु त्यांने दिलेला सल्ला बंधनकारक नव्हता. मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या नेमणूका, पदोन्नती , पदच्युती सर्वस्वी सुलतानाच्या मर्जीवर अवलंबून असे. अशाप्रकारे राज्यातील कार्यकारी विभाग, कायदेविभाग व

न्यायविभाग हे महत्त्वाचे विभाग सुलतानाच्या हाती केंद्रित झाले होते.

मंत्रि परिषद

प्रशासनाच्या सोयीसाठी व सुलतानाला सहकार्य करण्यासाठी व सुलतानाला सल्ला देण्यासाठी मंत्रिपरिषदेची निर्मिती केली होती. मंत्र्याने किंवा मंत्री परिषदेने दिलेला सल्ला सुलतानावर बंधनकारक नव्हता. सुलतानाच्या आदेशाप्रमाणे मंत्री आपल्या खात्याचा कारभार पाहत असे. आपल्या खात्याच्या कारभाराबाबत मंत्री सुलतानाला जवाबदार होते. मंत्र्याची नियुक्ती, पदोन्नती व पदच्युती हे सर्व सुलतानाच्या मर्जीवर अवलंबून होते.

१. दिवा□ -ए-वझारत

या विभागाचा प्रमुख वजीर असे. तोच मंत्री परिषदेतील मुख्य प्रधान होता. वजीराचे पद सुलतानाखालोखाल होते. अत्यंत लायक,विश्वासू व प्रामाणिक व्यक्तिचीच सुलतान वजीर म्हणून नेमणूक करीत असे. सुलतानाच्या गैरहजेरीत पत्र व्यवहार पाहणे, मंत्र्यांच्या कारभारावर देखरेख ठेवणे, राज्याच्या जमाखर्चाचा हिशेब ठेवणे, सुलतान व प्रजा यांच्यात समन्वय प्रस्थापित करणे इ. कार्य वजीराला करावी लागत असत.

२. दिवा-न -ए-आरिज

या विभागाचा प्रमुख सेनापती असून त्याला आरिज ए मुमालिक असे ही म्हणत असत. हाच राज्याचा सैन्य मंत्री ही होता. त्याची पदच्युती व नियुक्ती सुलतान करीत असे. आरिफ ए मुतालिक याला पुढील कार्य करावी लागत.

१. संपूर्ण लष्करावर देखरेख ठेवणे.
२. सैन्यात नवीन सैनिकांची भरती करणे.
३. सैन्याची शिस्त व संघटन राखणे.
४. सैनिकांमध्ये शस्त्रास्त्रांचा पुरेसा व चोख बंदोबस्त ठेवणे.
५. सैनिकांच्या वेतनाचे वितरण करणे.
६. सैनि□ांमध्ये रसद पुरवि□.
७. सैनिकांने घोड्याचे रेकॉर्ड ठेवणे तसेच वेळप्रसंगी
८. आरिफ-ए-मुतालिकला म्हणजेच नेतृत्व करावे लागत असे.

३. दिवा-न -ए - इन्शा

या विभागाच्या प्रमुखाला उबीर म्हणत या खात्याकडे राजकीय पत्रव्यवहाराचे काम होते. सरकारी आज्ञापत्रे, परराज्याशी व्यवहार, दानपत्रे या संबंधीची कामे या मंत्रालयामार्फत होत असत. तसेच प्रजेच्या तक्रारी, अर्ज, विनंत्या, मागण्या , बातम्या सुलतानाला देत असत.

४. दिवा-न-ए-रसालत : (परराष्ट्र मंत्री)

विभा□ाच्या मंत्र्याला सदर-उस-सुदूर असे म्हणत असत. दिवान-ए-रसालत या खात्याकडे धार्मिक बाबी, छात्रवृत्ती व धर्मादाय खाते असून परकीय राष्ट्रातील वकिलाचे स्वागत करणे, परदेशी राजदूत व शिष्टमंडळाचे स्वागत करणे हे त्याचे मुख्य कर्तव्य होते. परराष्ट्राशी पत्र व्यवहार करत असे. तसेच राज्यातील दानधर्म खाते त्याला सांभाळावे लागत असे.

५. दिवा-ने-ए-□ाझा

हे न्याय खाते असून त्यांचा मंत्री सदर-उस-सुदूर हा राज्याचा मुख्य काझी असे. काझी हाच राज्याचा न्यायदान विभागाचा प्रमुख होता. संपूर्ण न्याय व्यवस्थेचे निरीक्षण व परिक्षण त्याच्याकडेच होते. तसेच राज्यातील दिवानी व फौजदारी खटल्याचा निकाल देणे सुलतानशाहीच्या काळात न्यायदान प्रचलित रूढी आणि परंपरेचा आधार करण्यात येत असे अर्थात न्यायव्यवस्थेचा सर्वेसर्वा सुलतानच असे त्यानंतर काझी किंवा न्यायाधीश असे. आलेल्या तक्रारी झालेले □ुन्हे या संदर्भात काझी न्याय देत असे. कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशाच्या नियुक्त्या काझी करत असे.

६. दिवा-न-ए-बरीद

यालाच गुप्तचर विभाग म्हणत असत. हा राज्यातील अतिशय महत्त्वाचा विभाग होता. या विभागाच्या प्रमु□ाला बरीद-ए-ममालिक म्हणत. त्याचे कार्य गुप्तचराच्या नियुक्त्या करणे, साम्राज्यातील घडामोडीच्या बातम्या सुलतानाला देणे, गुप्तहेर पाठविणे. राज्यात व शेजारच्या देशात गुप्तहेर पाठविणे. जनतेच्या आणि सैन्याच्या घातक हालचाली सांगणे. एकंदरित गुप्तहेर साम्राज्यातील घडामोडीची इत्यंभूत माहिती सम्राटापर्यंत पोहचवित असे.

प्रांतीय प्रशासन :

सल्तनत साम्राज्याची विभागणी साम्राज्याच्या सोयीसाठी अनेक प्रांतात करण्यात आली होती. सुरूवातीच्या काळात प्रांतांना इक्ता म्हणत. इक्ताच्या प्रमुखास इक्तेदार म्हणत. नंतरच्या काळात प्रांताला सुभा म्हटले जाऊ लागले. व सुभ्याच्या प्रमुखाला सुभेदार म्ह□त असत. सुलतानाच्या राज्यात तेवीस सुभे अस्तित्वात होते. मोठया प्रमुखाच्या सुभेदाराला वली तर छोटया प्रांताच्या सुभेदाराला मुफ्ती म्हणत किंवा त्याला सुभेदार म्हणत.

सुभेदार :

सुभेदार हा प्रांत किंवा सुभ्याचा प्रमुख अधिकारी होता. या पदावर राजा आपल्या विश्वासातील व्यक्तिची किंवा राजपरिवारातील व्यक्तीची नियुक्ती करीत असे. प्रांतीय शासन आपल्या कार्याच्या बाबतीत केंद्रीय प्रशासनाला जबाबदार असे. सुभेदाराला पुढील कामे करावी लागत असत.

१. प्रांतात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे.
२. सुलतानाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे.
३. सुलतानाला आवश्यकता वाटल्यास लष्करी मदत करणे.
४. प्रांताला आवश्यक तेवढी रक्कम ठेवून शिल्लक रक्कम केंद्रिय कोषागारात पाठविणे.
५. प्रांतातील सैन्याची देखरेख ठेवणे.
६. गुन्हेगारांना शिक्षा ठोठावणे.
७. प्रांतामधील गुन्हेगारांना शिक्षा देणे.

जिल्हा प्रशास-न (सर□ार)

प्रांताचे विभाजन निरनिराळया जिल्ह्यात करण्यात आलेले होते. जिल्ह्याला शिक असे म्हणत. जिल्ह्याच्या प्रमुख अधिकार शिखदार म्हणत असत किंवा त्याला शिकदार-ए-शिकदारन असे म्हणत. त्याच्या मदतीला मुन्सीफ हा न्यायदानासाठी व अमिन हा महसूल गोळा करण्यासाठी मदत करत असे. तसेच त्यांच्या हाताखाली फार मोठा अधिकारी वर्ग होता. जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण

करणे. तसेच बंडखोरांना नियंत्रित करणे, सैन्य बाळगणे, महसुलाची व्यवस्था ठेवणे, अधिकार क्षेत्रातील परगण्याचे नियंत्रण, नियमन, आणि निरीक्षण करत असे.

पर□□ा प्रशास-न

सुलतान राजवटीतील प्रशासनाच्या सोयीसाठी जिल्ह्याचे अनेक तालुक्यात म्हणजेच सरकारचे अनेक परगण्यात विभाजन करण्यात आलेले होते. परगण्याच्या प्रमुखाला तहसीलदार या नावाने ओळखले जात असे. व त्याला मदत करणारे अधिकारी पुढील प्रमा□.

१. अंमल हा अधिकारी परगण्यात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम करीत असे. शासन व्यवस्था व्यवस्थित चालविण्याचे काम याच अधिकाऱ्याचे होते.
२. मुशरुफ : हा अधिकारी परगण्यात करवसुलीचे काम करीत असे.
३. खजिनदार : परगण्यातील आय व्ययचा हिशोब ठेवण्याचे काम खजिनदार हा अधिकारी करीत असे.
४. कारकून : प्रशासकीय अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामकाजात दोन कारकूनाची नियुक्ती केली जात असे.
५. कानूनगो हा अधिकारी परगण्यातील पटवाऱ्यांवर नियंत्रण ठेवत असे. जमीन महसुलाची नोंद ठेवणे आणि त्याची माहिती उच्च अधिकाऱ्यास देणे ही कामे होती.
६. चौधरी : चौधरी हा अधिकारी परगण्यात दौरा काढून शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे अवलोकन करत असे. आणि त्या परिस्थितीची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यास सादर करत असे.

□ाम प्रशास-न व्यवस्था :

परगण्याची विभागणी अनेक गावात किंवा खेडयात करण्यात आली होती. ग्राम प्रशासन हे सल्तनत कालीन प्रशासनाचा शेवटचा घटक होता. पाटील (नंबरदार) पटवारी (कुलकर्णी) व चौकीदार हे ग्राम प्रशासनातील महत्वाचे अधिकारी होते.

पाटील - हा गावात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असे.
पटवारी - पटवारी हा भूमीकर वसूल करत असे.
चौकीदार - गावाचा दिवसाचा व रात्रीची पहारा करत असे.
पंचायत - गावातील प्रतिष्ठित लोकांची पंचायत असे. हे सर्व प्रतिष्ठित लोक पंचायतचे सभासद असून तेच ग्रामीण भागात न्यायदाने काम गावपातळीवर करत असत. प्रत्येक गावांना राज्यकारभाराच्या बाबतीत अंतर्गत स्वायत्तता होती.

लष□री व्यवस्था :

सल्तनत साम्राज्याचे संरक्षण लष्कराच्या शक्तीवर अवलंबून होते. खिलजी अल्लाऊद्दीन याने प्रथम स्थाई सेनेची ऊभारणी केली. त्यांच्याकडे घोडदळ, पायदळ, व हत्तीदळ ही सेनेची महत्त्वाची तीन अंगे होती. सैन्याचा मुख्य आधार घोडदळ होते. हत्तीच्या वाहतुकीसाठी उपयोग करत असत. घोडेस्वार याच्याकडे एक धनुष्यबाण एक भाला व दोन तलवारी असत. युध्दप्रसंगी, सैन्य लोखंडी कवच घालत असे. हिंदु, गुलाम, मुसलमान, तुर्क व इराणी लोकांचा समावेश पायदळात होता.

सुलतान हा सैन्याचा सर्वोच्च सेनापती व अधिकारी होता. त्याच्या खालोखाल एक सैन्यमंत्री असे. तो शक्तीशाली सैन्यव्यवस्था बनवण्याचा प्रयत्न करत असे. सुलतान काळात घोड्याला डाग देण्याची प्रथा प्रचलित झाली. राज्याच्या रक्षणासाठी महत्वाच्या ठिकाणी लष्कर ठेवले जात असे. अंतर्गत विद्रोह लवकर नष्ट करता यावा यासाठी किल्ल्ल्यात लष्कर व युध्द साहित्य ठेवले जात असे. प्रांताच्या सुभेदाराकडे लष्कर असे. आवश्यकता भासल्यास तो सुलतानाला लष्करी मदत करत असे.

गुप्तहेर व्यवस्था :

सुलतानांनी आपल्या साम्राज्यात गुप्तहेर व्यवस्था स्थापन केली होती. गुप्तहेरांच्या कार्यकुशलतेमुळे सुलतानाला राज्यातील बातम्या व सूचना ताबडतोब समजत असत. राज्यातील अमीर पदाधिकारी आणि प्रांतीय सुभेदारावर देखरेख करण्यासाठी काही गुप्तहेर नियुक्त केले जात असत. गुप्तहेरच साम्राज्यातील असंतोष किंवा अराजकता अथवा राजद्रोह कोणी करत असेल तर गुप्तहेर तशी माहिती ताबडतोब सुलतानाला देत असत.

-याय व्यवस्था :

सुलतान हाच राज्याचा सर्वोच्च न्यायाधीश होता. न्यायदानाचे काम काजी करत असे. नगर, परगणा, आणि दिल्ली या ठिकाणी काजी चांगल्याप्रकारे न्यायदानाचे काम करत असत. सुलतान न्यायप्रिय होते. कुराणानुसार न्यायदान करत असत. व खटल्याचा निकाल लवकरात लवकर लावत असत. फौजदारी खटल्याचा निर्णय इस्लामी कायद्यानुसार दिला जात असे. हिंदूचे दिवाणी खटले हिंदू परंपरेनुसार सोडविले जात असत. त्यासाठी वादी आणि फिर्यादी हिंदूच असले पाहिजेत परंतु खटल्यातील एक पक्ष जरी मुस्लिम असला तर मग मात्र खटल्याचा निर्णय इस्लामी कायद्यानुसार केला जात असे. खेडेगावात न्यायदानाचे काम पंचायती मार्फत केले जात असे.

शिक्षेचे प्रकार

१. साधारण गुन्ह्यासाठी कोडे मारले जात असत.
२. एखाद्या गुन्हेगारांनी जर गंभीर गुन्हा केला असेल तर त्याला हातपाय तोडण्याची शिक्षा दिली जात असे.
३. राजद्रोह करणाऱ्यांना मृत्युदंडांची शिक्षा देत असत.
४. एखाद्या दुकानदाराने जर कमी माल दिला असेल तर त्या दुकानदाराचा गुन्हा सिध्द झाला तर त्या दुकानदाराचे तेवढं मांस काढून घेण्याची शिक्षा अल्लाऊद्दीन खिलजीच्या काळात होती.

संदर्भ थ :

१.सक्सेना आर.के. - सल्तनतकालीन शासनप्रणाली.
२.हबीब इरफान (अनु.रमेश रावत) - भारतीय इतिहास मे मध्यकाल.
३.प्रा.प्रशांत सु. देशमुख - भारताचा इतिहास इ.स.६५०-१५५०, विद्याभारती प्रकाशन, लातूर, डिसेंबर - २००३.
४.डॉ.रा. ी. ोलार र - मध्ययुगीन भारताच इतिहास.
५.डॉ.धनंजय आचार्य - मध्ययुगीन भारत इ.स. १००० ते १७०७, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००८.
६.प्रा.भांडवलकर एस.एस. - भारताचा इतिहास, अभिजित पब्लिकेशन, लातूर, जुलै २००२.
७.डॉ.काटे पी.व्ही. - मध्ययुगीन भारताचा इतिहास, इ.स.१००० ते १७०७, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जुलै १९९७.
८.प्रा.मदन मार्डीकर - मध्ययुगीन भारताचा इतिहास, इ.स.१००० ते १७०७, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा.
९.डॉ.अनिल कठारे, प्रा.डॉ.संदेश वाघ, प्रा.डॉ.अंबादास मंजुळकर - मध्ययुगीन भारताचा इतिहास, इ.स.१००० ते १७०७, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, जुन २००१
१०.वैद्य सी.व्ही. - मध्ययु -न भारत.